# सचिन सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित

मिठागर रोड, मुलुंड (पूर्व), मुंबई-४०००८१

**(Regd. No. BOM/HSG/1629 of 1968)**

न.क्र. ____________________

दि. २२/०४/२०२५

**— सूचना —**

सचिन सहकारी संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा रविवार दिनाक ०४ मे २०२५ रोजी दुपारी ठीक ०४-३० वाजता संस्थेच्या श्रीगणेश मंदिरात खालील विषय सूचीनुसार कामकाज करण्यासाठी आयोजित करण्यात आलेली आहे.

**—— विषय सूची ——**

१) श्री. अमित गोडसे CA यांचे , विकासक मे. HGP COMMUNITY -(हिरानंदांनी ग्रुप) आणि मे. वेंकटेश बिल्डकॉन याच्या आर्थिक ताळेबंद / आर्थिक माहितीचे सादरीकरण व अभिप्राय.

२) नरेन कुवाडेकर प्रोजेक्ट कन्सलटंटचे श्री. केदार पाठारे व Adv. Smt. दीक्षिता गुप्ते यांचे अभिप्राय

३) 79 A ची रंगीत तालीम

धन्यवाद,

Milind

मिलिंद राऊळ

( मा . सचिव )

**सोबत** : वरील विषयाची टिपणी पाठविण्यात येत आहे.

---------- टिपणी ----------

दिनांक : 22/04/2025

प्रथमतः पुनर्विकासच्या दृष्टीने आपण आवश्यक असलेली निविदा प्रक्रिया पूर्ण केली. त्यानंतर निविदा भरलेले दोन विकासक म्हणजेच मे . H G P COMMUNITY PVT LTD - Hiranandani group व मे. वेंकटेश बिल्डकॉन ह्या विकासकांची पूर्ण झालेली बांधकामे, चालू असलेली बाधकामे ह्याची पहाणी ( SITE VISIT ) करण्यात आली. त्यानंतर सचिन गृह. निर्माण संस्थेचा पुनर्विकास, विकासकांच्या दृष्टीने कश्या प्रकारे होऊ शकतो / होऊ शकेल ह्याचे सादरीकरण आपल्या समोर दि. 15 फेब्रुवारी 2025 रोजी करण्यात आले होते.त्यावेळी संस्थेचे सभासद व त्यांचे कुटुंबीय हजर होते.

मे .HGP CAMMUNITY PVT LTD ( Hiranandani group ) मे. वेंकटेश बिल्डकॉन. ह्या दोन्ही विकासकांचे आर्थिक मूल्यमापन करण्यासाठी आपण ह्यामधील तज्ञ श्री. आमित गोडसे CA ( Asmita Consultancy ) यांची नियुक्ती केलेली आहे. त्यासाठी त्यांनी दोन्ही विकसकांकडून त्यांचा आर्थिक ताळेबंद / माहिती मागविली होती. त्याचे विश्लेषण करून त्याबाबतचा मूल्य मापनाचा तक्ता आपल्यासमोर स्क्रीनवर / पडद्यावर प्रोजेक्टर द्वारे सादर केला जाणार आहे. ह्यावरून आपल्याला विकासक निवडण्यास मार्गदर्शन मिळू शकेल / सोपे पडेल.

त्याचप्रमाणे ह्यावेळी आपले प्रकल्प सल्लागार नरेंन कुवाडेकर प्रोजेक्ट कन्सलटंटचे श्री. केदार पाठारे व आपल्या कायदेशीर

सल्लागार श्रीम. दीक्षिता गुप्ते ( Advocate ) उपस्थित राहणार आहेत.

ह्या सर्व तज्ञांचा सल्ला / मार्गदर्शन घेऊनच आपण पुढे जाणार आहोत /मार्गक्रमण करणार आहोत.

**79A ही विकासक निवडण्याची अंतिम प्रक्रिया आहे,** ह्याची रंगीत तालिम देखील ह्याच दिवशी घेण्यात येणार आहे. त्यासाठी जास्तीत जास्त सभासदानीह्या वेळी उपस्थित रहावे.

**टीप:** 79A च्या प्रस्तावासाठी एकूण सभासदांच्या **75%** ( **165** ) सभासदांची उपस्थिती आवश्यक असणार आहे व एकूण सभासदांच्या **51%** ( **113** ) सभासदांची ह्या प्रस्तावास मान्यता आवश्यक असणार आहे ह्याची नोंद घ्यावी.

धन्यवाद,

मिलिंद राऊळ

( मा . सचिव )